# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०१ जुलै, २०२५ / आषाढ १०, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

### लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औदयोगिक वसाहतीतील कंपन्यांच्या प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबत

**(१) * ७३०६ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांत प्रक्रिया करून तयार झालेला शेकडो टन घनकचरा व राख बोरज धरण परिसरातील मोकळ्या जागेत पसरवून त्यावर माती टाकून लपविण्यात येत असल्याचे दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रासायनिक घनकचऱ्याचे पाणी धरणातील जलाशयात मिसळल्याने पाणी दूषित होवून नागरिकांच्या जिविताला धोका निर्माण झाल्याने याप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोटे औद्योगिक वसाहतीतील घनकचरा व प्रक्रिया न केलेले सांडपाणी उघडयावर सोडण्याचे प्रकार वारंवार घडत असूनही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे कारखानदारांशी संगनमत असल्याने दोषी कारखानदारांवर जाणीवपूर्वक कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारखान्यांवर कारवाई करण्यासह प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीतील उद्योगांच्या केलेल्या स्थळ पहाणी दरम्यान दोषी आढळलेल्या मे. रिव्हरसाईड इंडस्ट्रिज या उद्योगास पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व घातक घनकचरा अधिनियम अंतर्गत दिनांक २५.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित निर्देश देण्यात आलेले होते. तद्नंतर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने उद्योगाला दिनांक १८.०६.२०२५ रोजी बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील कारखान्यांचा प्रदूषण निर्देशांक ६० पेक्षा अधिक असल्याबाबत

**(२) * ७६२६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील १८८० कारखान्यांचा प्रदूषण निर्देशांक ६० पेक्षा अधिक असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारखान्यातील रसायनांच्या अतिवापरामुळे जल व वायू प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊन अनेकांचा त्यामुळे मृत्यूही झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जल व वायू प्रदूषण रोखण्यासह संबंधित दोषी कारखान्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली यांनी निर्गमित केलेल्या दि.०७/०३/२०१६ रोजीच्या सुधारित निर्देशानुसार ज्या उद्योगांचा प्रदूषण निर्देशांक ६० च्या वर आहे असे ठाणे जिल्ह्यातील एकूण १६०६ उद्योग लाल संवर्गामध्ये मोडतात.
(२) हे खरे नाही.
जिल्हा आरोग्य अधिकारी, ठाणे व जिल्हा आरोग्य अधिकारी, नवी मुंबई यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊन त्यामुळे मृत्यू झाल्याबाबतची तक्रार कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंब्रा (जि.ठाणे) पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीची झालेली हत्या

**(३) * ९५९० श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार**

**(ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि.ठाणे) पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या सम्राटनगर परिसरातील श्रद्धा प्राप्ती बिल्डिंगमध्ये एका दहा वर्षीय अल्पवयीन मुलीची क्रूर हत्या केल्याची घटना माहे एप्रिल, २०२५ मध्ये घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळवा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदनाच्या अहवालात मृत अल्पवयीन मुलीला मारहाण, अत्याचार, धारदार शस्त्राने तिच्या मानेवर वार करून बाथरूमच्या खिडकीतून सहाव्या मजल्यावरून फेकल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित आरोपींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

सदर प्रकरणी मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु.र.नं.५७७/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ९६, १३७ (२), ६४, ६५ (२), ६४ (आय), २३८ सह बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंध अधिनियम सन २०१२ चे कलम ४, ६, ८, १२ अन्वये दि. ०८.०४.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे,

वैद्यकीय अधिकारी यांनी “Haemorrhage and Shock due to stab injury over neck causing injury to vital structures with evidence of sexual assault” असा अहवाल दिला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून त्याच्याविरुध्द दि.३०.०५.२०२५ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने माहिती व तंत्रज्ञान प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागार म्हणून मे.के.पी.एम.जी. या संस्थेची नियमबाह्य केलेली नेमणूक

**(४) * ७११३ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून माहिती तंत्रज्ञान प्रकल्प राबविण्यासाठी सन २०१८ च्या शासन धोरणानुसार मे.के.पी.एम.जी. या शासनमान्य संस्थेची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात येवून त्याकरिता वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी ९ बिगर माहिती तंत्रज्ञान प्रकल्पासाठी उक्त संस्थेला नियमबाह्य पद्धतीने सल्लागार म्हणून नियुक्ती दिली असून त्यात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १७अ नुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महामंडळाच्या गैरव्यवहार करणाऱ्या ९ अधिकाऱ्यांविरूध्द कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने महामंडळाच्या स्तरावर अंतर्गत चौकशी करुन नियमबाह्य कामे करणाऱ्या उक्त संस्थेस कायमस्वरूपी काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत तसेच गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२) मे. के.पी.एम.जी. या सल्लागार संस्थेला बिगर माहिती व तंत्रज्ञान प्रकल्पासाठी नियुक्ती देण्यात आली नव्हती.
(३) होय.
(४) व (५) रा.प.महामंडळातर्फे या सर्व तक्रारींची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक कायदा कलम १७-अ करण्यासाठी लागणारी परवानगी संबंधित विभागाला देण्यात आली आहे. या सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध रा.प.महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता खात्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे. मे.के.पी.एम.जी. या सल्लागार संस्थेच्या सल्लागारांविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गैरव्यवहाराच्या आरोपावरुन चौकशी सुरु आहे असे सल्लागार संस्थेला तालिकाबध्द करणाऱ्या माहिती व तंत्रज्ञान विभागाला कळविण्यात आलेले आहे.

-----------------

## सिस्का एल.ई.डी. कंपनीच्या संचालकांनी पैसे दुप्पट करून देण्याचे अमिष दाखवून गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

**(५) * ७४४१ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिस्का एल.ई.डी. कंपनीच्या संचालकांनी पैसे दुप्पट करून देण्याचे अमिष दाखवून टोरेस या कंपनीच्या माध्यमातून अंदाजे ७५० कोटी रुपयांची गुंतवणूकदार व बँकांची फसवणूक केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कंपनीच्या सनदी लेखापाल (Chartered Account) यांनी ४ संचालकांविरुद्ध आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी ई-मेल द्वारे तक्रार केली असता, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीही कारवाई केली नसल्याचा आरोप गुंतवणूकदारांनी केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणातील संबंधित आरोपींनी कॅनडामध्ये पळून जाण्याचा देखील प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा प्रकारच्या फसवणूकीच्या प्रकाराला आळा घालण्याबाबत व देशातून बाहेर जाण्याला प्रतिबंध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सिस्का एल.ई.डी.कंपनीच्या संचालकांनी पैसे दुप्पट करुन देण्याचे खोटे आमिष दाखवून टोरेस या कंपनीच्या माध्यमातून गुंतवणूकदार व बँकांची फसवणूक केल्याबाबत कोणतीही तक्रार वा गुन्हा दाखल नाही. परंतु, सिस्का एल.ई.डी. कंपनीचे मालक असल्याचे खोटे सांगून आर्थिक फसवणूक केल्याबाबतचा तक्रार अर्ज आर्थिक गुन्हे

शाखा, पुणे येथे प्राप्त आहे. सदर तक्रार अर्जामध्ये अर्जदाराची एकूण रु.७,२०,००,०००/- इतक्या रकमेची फसवणूक केल्याचे नमूद केले आहे.

तर मे.प्लॅटिनम हर्न प्रा.लि.कंपनीच्या संचालकांनी टोरेस नावाचे शोरुम स्थापन करुन मोजोनाईट हा खडा खरेदी केल्यास, त्यावर गुंतवलेल्या रक्कमेवर आठवड्याला ६% प्रमाणे परतावा देण्याचे आमिष / प्रलोभन दाखवून लोकांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले. सदर आमिषाला बळी पडून गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याबाबत राज्यात एकूण ४ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सदर दाखल गुन्ह्यांमध्ये एकूण १९,४३२ गुंतवणूकदारांची रु.१८९.२८ कोटी इतक्या रकमेची फसवणूक झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

सिस्का एल.ई.डी. कंपनीच्या संचालकांविरुद्ध आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे ई-मेल द्वारे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील टायर रिसायकलिंग कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(६) * ८१९० श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील उसर, दिनकरपाडा, वडवली, बिलोशी, पालसई, सापना, किरवली, नेहरोली, तोरणे, कोन, कोनसई अशा गावांमध्ये मोठ्या प्रमाणात ५२ विविध प्रकारचे प्रदूषणकारी कारखान्यांमध्ये व टायर रिसायकलिंगच्या कंपन्यामध्ये सर्व नियम डावलून चुकीच्या पद्धतीने "रबर पायरोलीसिस" ही प्रक्रिया वापरली जात असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारखान्यांमधून निघणाऱ्या धुरामुळे नागरिकांची फुफ्फुसे निकामी झाली असून त्यातील काही जणांना कॅन्सर व जेष्ठ नागरिकांना श्वसनाचे विकार झाले असून अनेकांना त्वचारोग होऊन त्यांची नखे देखील काळवंडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, युनायटेड किंग्डम व अन्य देशांमधून सुमारे ०३ लाख पेक्षा अधिक वापरलेले टायर प्रक्रिया करण्यासाठी कारखान्यांमध्ये आणले जातात व हे रबर टायर्स ऑक्सिजनरहित वातावरणामध्ये ५०० डिग्री सेल्सिअसपर्यंत वितळवण्यासाठी प्रेशर कुकर सारखे बॉयलर्स त्यासाठी वापरावे लागत असून या कारखान्यांमध्ये अग्निशामक यंत्रणेची कोणतीही सुविधा नसून वन विभागाच्या परवानग्या न घेता सर्व नियम डावलून हे कारखाने सुरू असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कंपन्यांमध्ये वारंवार अपघात होऊन अनेक कामगार मृत्युमखी पडत असून प्रदूषणामुळे शेतीचेही नुकसान होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून वारंवार करुनही कंपनीविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांच्या आरोग्यास हानीकारक असलेल्या संबंधित कारखान्यांवर व यास जबाबदार असलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

तथापि, जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांचेकडून दि.१४/०६/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार संबंधित कारखान्यामुळे होणारे वायू प्रदूषण व त्यामुळे होणारे आजार जसे नागरिकांची फुफ्फुसे निकामी होणे, कॅन्सर, श्वसनाचे आजार तसेच त्वचारोग व नखे काळी पडणे या समस्या असलेले रुग्ण आढळून आलेले नाहीत.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रक्रियेमध्ये वेस्ट टायर्सचे पायरोलीसीस पध्दतीने प्रक्रिया केली जात असून पायरोलीसीस रिॲक्टरमध्ये २५० ते ३०० डिग्री से. इतक्या तापमानाचा वापर केला जातो.

(४) हे खरे नाही.

सहसंचालक, औदयोगिक सुरक्षा व आरोग्य, यांचेकडून दि.१७/०६/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार मागील तीन वर्षात पायरोलीसीस पध्दतीने स्क्रॅप टायरपासून पायरोलीसीस ऑईल व कार्बन ब्लॅक पावडर बनविणाऱ्या कारखान्यामध्ये ७ अपघात झाल्यामुळे सदर अपघातांची सखोल चौकशी करुन ७ फौजदारी खटले प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वसई यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळांतर्गत असलेल्या जागेवर होर्डिंग व डिजिटल जाहिरातीचा नियमबाह्य परवाना दिल्याबाबत

**(७) * ९९५३ श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाअंतर्गत असलेल्या जागेवर होर्डिंग, बस स्थानकातील जाहिरात, बस स्टँडवरील जाहिरातीचे फलक, डिजिटल जाहिराती, एसटी बसच्या मागे तसेच हँडलवर जाहिराती केल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस. टी महामंडळाच्या नियोजन आणि पणन विभागाच्या प्रस्तावानुसार एसटी बस स्थानकातील होर्डिंगवर जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी टेकसिद्धी ॲडव्हर्ट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीस २३ मार्च, २०२४ ते २२ फेब्रुवारी, २०२९ या कालावधीसाठी जीएसटी वगळून १२ कोटी २२ लाख २० हजार रुपये वार्षिक देकर देणे बंधनकारक करुन परवाना देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जाहिरात ठेकेदार कंपनीने कराराचे पालन न करता माहे मे, २०२४ ते डिसेंबर, २०२४ मध्ये मासिक परवाना भाडे दिले नसल्याने महामंडळाचे ९ कोटी ६१ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मासिक भाडे थकले असतानाही एसटी महामंडळात डिजिटल जाहिरातीसाठी स्वतंत्र निविदा न काढता टेकसिद्धी ॲडव्हर्ट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीस प्रत्यक्षात होर्डिंगवरील मासिक भाडे दरातच डिजिटल जाहिरातीसाठी ५ वर्षाच्या कालावधीकरीता नियमबाह्यरीत्या परवाना देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यावर व जाहिरातदार ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) होय.

(३), (४), (५) व (६) परवानाधारक मे. टेकसिद्धीॲडव्हर्ट प्रायव्हेट लिमिटेड यांना माहे मे २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीचे मासिक परवानाशुल्क विहित वेळेत अदा न केल्याने, थकबाकीचे समान हप्ते करुन थकबाकी सव्याज वसुलीबाबतची कार्यवाही सुरु असून, कंपनीला देण्यात आलेले डिजिटल जाहिरातीचे अधिकार काढून घेण्यात आले आहेत.

-----------------

**सेनगाव (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील सरपंच व ग्रामस्थांनी महिलेला केलेली मारहाण**

**(८) * ७९३२ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेनगाव (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील एका महिलेने अर्धशिशीचा त्रास होत असल्याने गावातील मंदिराचा लाऊडस्पीकर बंद करा व घरापुढील पिठाची गिरणी हटवा अशी मागणी करुन पोलीस ठाण्यात तक्रार केल्याच्या रागातून गावचे सरपंच आणि इतर ९ जणांनी त्या महिलेला जेसीबीच्या रबर पाईप व काठ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी युसुफवडगाव पोलीस ठाण्यात सरपंच व इतर व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणी तात्काळ चौकशी करुन आरोपींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मा.उपमुख्यमंत्री यांनी पोलिसांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच बीड येथील श्री.शिवराज दिवटे या युवकाला १० जणांनी अमानुषपणे मारहाण केली असल्याचे दिनांक १७ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त संपुर्ण प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) याप्रकरणी सेनगाव (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील फिर्यादीने दिनांक १४/०४/२०२५ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीस ठाणे, युसुफवडगाव जि. बीड येथे गुन्हा रजिष्टर नं.११३/२०२५ कलम११८(२), ११८(१), ११५(२), ७४, १८९(२), १९१(२), १९०, ३५२, ३५१(२) भा.न्या. सं. २०२३ अन्वये १० आरोपीतांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

तसेच, फिर्यादी शिवराज नारायण दिवटे यास दि.१६/०५/२०२५ रोजी मोटार सायकल अडवून अमानुषपणे मारहाण केली आहे. यावरून पोलीस ठाणे, संभाजीनगर परळी जि.बीड येथे गुन्हा रजिष्टर नं. १०५/२०२५ कलम१०९,१२६(२),१४०(३),११८(१),१८९(२)(४), १९०,१९१(३) भा.न्या.सं. २०२३ प्रमाणे एकूण १० आरोपी व अनोळखी १० आरोपीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड (जि.बीड) येथील पोलीस वसाहतीतील नव्या इमारतींमध्ये निकृष्ट दर्जाचे काम केल्याबाबत**

**(९) * ७१४९ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड (जि.बीड) येथील पोलीस वसाहतीमध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये दरवाजे व खिडक्यांच्या झालेल्या दूरवस्थेमुळे पोलीस व त्यांच्या कुटुंबियांच्या जिवाला धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नव्याने बांधलेल्या इमारतींमध्ये वापरण्यात आलेले निकृष्ट दर्जाचे साहित्य, खिडक्या-दारांची झालेली दुरवस्था व भिंतींमध्ये पडलेल्या भेगांमुळे संरचनेत असुरक्षितता निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारच्या निकृष्ट बांधकामामुळे पोलीस अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांना धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्य करावे लागत असल्याने जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदार व अभियंत्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

दि.१२/०५/२०२५ रोजी जोराने वारा सुटल्याने वारा घरात घुसल्याने पोलीस वसाहतीमध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये दरवाजाच्या कडीकोंडा व दरवाजा तुटला आहे. तसेच खिडक्याची स्लाईडींग फ्रेमसह निघुन पडली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

दिनांक १२/०५/२०२५ रोजी जोराचे वादळामुळे काही खिडक्यांचे व दरवाज्यांचे नुकसान झाले. तथापि, कंत्राटदारामार्फत सर्व दुरुस्ती प्रकल्प सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली लगेचच ०७ दिवसात पूर्ण करण्यात आली असून इमारती सध्या सुस्थितीत असून पोलीस रहिवासी वास्तव्यास आहेत.

(४) सदर प्रकरणी धनश्री बिल्डकॉम प्रायव्हेट लिमीटेड या कंपनीवर शिवाजीनगर पोलीस ठाणे गुरनं २६९/२०२५ कलम १२५,१२५ (२), बीएनएस. प्रमाणे दिनांक १३/०५/२०२५ रोजी २३:३० वा. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापि, कंत्राटदारामार्फत सर्व दुरुस्ती करण्यात आली असून पोलीस रहिवासी वास्तव्यास आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यात महावितरणकडून सक्तीने "स्मार्ट प्रीप्रेड मीटर" लावले जात असल्याबाबत**

**(१०) * ७८०५ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरणकडून ग्राहकांसाठी सक्तीने "टाईम ऑफ डे" मीटरच्या (टीओडी मीटर) नावावर "स्मार्ट प्रीप्रेड मीटर" लावले जात असून प्रत्यक्षात जुनेच मीटर असतांना देयकात मात्र स्मार्ट मीटर क्रमांक दर्शवून ग्राहकांना सरासरी वीज देयक दिले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तडसर व खेरड (ता.कडेगांव, जि.सांगली) येथील शेतकरी, कल्याण (जि.ठाणे) व मुंबईतील ग्राहकांनी 'स्मार्ट प्रिपेड प्रीपेड मीटर' बसविण्याबाबत विरोध दर्शविला असताना देखील सक्तीने स्मार्ट प्रिपेड मीटर बसविल्याबाबत महावितरण कार्यालयांवर निदर्शने करुन माहे एप्रिल, २०२५ मध्ये निवेदने देखील दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वीज मीटर प्रकरणी वीज अधिकारी/कर्मचारी संघटना व वीज ग्राहक यांचेसह स्मार्ट मीटरला सर्वांचाच विरोध असतांना, हे मीटर नियमबाहयपणे लावले जात असून अनेक ग्राहकांकडे तर मीटर्स लागले नसतांनाही तसे देयकांत दर्शवून जास्त शुल्क आकारले जात असल्याचे मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणले असता, अशाप्रकारे मीटर लावले जाणार नसल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्मार्ट मिटरसंदर्भात फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सुधारित वितरण क्षेत्र (RDSS) योजनेअंतर्गत महावितरणमार्फत राज्यातील ग्राहकांना लावण्यात येणारे मीटर हे प्रीपेड नसून पोस्टपेड पध्दतीने बसविण्यात येत आहे.

महावितरणमार्फत ग्राहकांना मीटर रिडींग प्रमाणे देयके देण्यात येतात. तथापि, अपवादात्मक स्थितीत ग्राहकांस चुकीचे बील दिले असल्यास दुरूस्त करून देण्यात येतात. सद्यस्थितीत ग्राहकांना लावण्यात आलेल्या (स्मार्ट किंवा जुने) मीटरच्या रिडींग प्रमाणे देयके देण्यात येत आहेत.

(२) हे खरे आहे,

तडसर व खेराडे (ता. कडेगाव, जि. सांगली) व कल्याण (जि. ठाणे) येथील ग्राहकांनी स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्याबाबत विरोध दर्शविला होता. महावितरणच्या सांगली मंडळ कार्यालयातंर्गत उपविभाग कडेगाव येथे दि.०७.०४.२०२५ रोजी मौजे खेराडे वांगी व तडसर ग्रामपंचायतीकडून स्मार्ट प्रीपेड मीटर न बसविण्याबाबत ग्रामपंचायत ठरावाचे निवेदन महावितरणच्या विटा विभागीय कार्यालयास देण्यात आले आहे. तसेच काही लेखी निवेदने प्राप्त झाले आहेत.

(३) व (४) सदर प्रकरणी आश्वासित केल्यानुसार, स्मार्ट मीटर हे महावितरणच्या विविध प्रणाली मध्ये बसविण्यात येत आहेत. आजपर्यंत २८,२०२ पैकी २८,२०२ इतक्या वाहिन्यांना व ४,०७,५०७ पैकी १,४०,५६१ इतक्या रोहित्रांना स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. तसेच सर्व प्रकारच्या ग्राहकांना (उच्चदाब / लघुदाब) बसविण्यात येत असून, आजपर्यंत एकूण २ कोटी २४ लाख ८८ हजार ग्राहकांपैकी ३२.२३ लक्ष ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्यात आलेले असून उर्वरीत ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरु आहे. सद्यस्थितीत सदर स्मार्ट मीटर हे पोस्टपेड पध्दतीने बसविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आयपीएलचे थेट प्रक्षेपणाचे अधिकृत हक्क असतानाही 'फेअरप्ले' ने अवैधरित्या थेट प्रक्षेपण दाखवुन आर्थिक नुकसान केल्याबाबत

**(११)** * **७७१५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'व्हायकॉम-१८' मीडिया प्रायव्हेट लि.कंपनीने आयपीएलचे थेट प्रक्षेपणाचे अधिकृत हक्क आपल्याकडे असतानाही 'फेअरप्ले' ने अवैधरित्या थेट प्रक्षेपण दाखवुन आर्थिक नुकसान केल्याची तक्रार मुंबई पोलिसांच्या सायबर कक्षात नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु प्रकरणात ४ हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम वस्तुंच्या आयातींचे बनावट व्यवहार दाखवुन विदेशात पाठवुन पुन्हा आरोपींच्या व सबंधित कंपन्याच्या खात्यावर भारतात वळविण्यात आल्याचा प्रकार निदर्शनास आल्यानंतरही अद्याप यावर सायबर पोलिसांनी चौकशी करुन दोषींविरुद्ध कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा बसविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) माहे ऑक्टोबर २०२१ ते दिनांक २०.०४.२०२३ दरम्यान कॉम्प्युटर सॉफ्टवेअरचा वापर करुन PIKASHOW APP, FOXI APP, VEDU APP, SMART PLAYER LITE APP, FILM PLUS APP, TEA TV APP, WOW TV APP, FAIR PLAY या ॲप्लीकेशनचे मालक, वितरक व जाहीरातदार यांनी कट रचून ॲप्लीकेशन व वेबसाईटच्या माध्यमातून Viacom१८ चे Colors प्रादेशीक चॅनल्स व MTV, Nick इत्यादी चॅनेल्सवरील कंटेन्ट तसेच VOOT SELECT वरील वेबसिरीज, चित्रपट, सिरीयल्स, टाटा आय.पी.एल. २०२३ क्रिकेट मॅच इत्यादींचे थेट प्रक्षेपणाचे अधिकार नसताना बेकायदेशीरपणे पुर्नप्रक्षेपण करुन Viacom१८ कंपनीकडील प्रक्षेपणाच्या अधिकाराचे उल्लंघन केले व कंपनीचे आर्थिक नुकसान करण्याच्या हेतुने अंदाजे १०० कोटी रूपयांपेक्षा जास्त आर्थिक फसवणूक केली तसेच शासनाची अप्रत्यक्षरित्या फसवणूक केल्या प्रकरणी नोडल सायबर पोलीस ठाणे, महाराष्ट्र सायबर, मुंबई या ठिकाणी गु.र.क्र. ०४/२०२३, भा.द.वि. चे कलम ४२०, १२०(ब), ४६८, ४६९, ४७१, माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ४३, ६६, ६६(ब) व कॉपीराईट ॲक्ट कलम ६३ अन्वये गुन्हा दाखल होता. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करून दि.२९.०५.२०२४ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.

त्यानंतर आरोपीने मा. उच्च न्यायालयात सदर गुन्हा Quashing करीता अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार नामे व्हायकॉम १८ मिडीया प्रायव्हेट लि. कंपनी व गुन्हयातील आरोपी यांच्या मध्ये परस्पर Settlement Agreement झाले असल्याने मा. उच्च न्यायालयाने दिनांक १२.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर नमुद गुन्हा Quash केला आहे.

राज्य शासनाने सायबर फसवणूकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधूनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प राबविण्यासाठी दि.२७.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर सायबर सुरक्षा प्रकल्पाचे उदघाटन महापे, नवी मुंबई येथील इमारती मध्ये करण्यात आले आहे. सदर प्रकल्प राज्यातील सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्हे नियंत्रणासाठी हा एक अत्याधुनिक केंद्रबिंदू ठरेल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भूकूम (ता.मुळशी, जि.पुणे) येथील महिलेने केलेली आत्महत्या

**(१२) * ११८८० श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूकूम (ता.मुळशी, जि.पुणे) येथील श्रीमती वैष्णवी हगवणे या विवाहित महिलेने आत्महत्या केल्याचे दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या शवविच्छेदन अहवालानुसार सदर महिलेच्या शरीरावर एकूण २९ जखमा आढळल्या असून त्यातील १५ जखमा मृत्यूच्या २४ तासाच्या आधीच्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महिलेस तिच्या सासरच्या मंडळींनी हुंड्यासाठी शारीरिक आणि मानसिक त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्व संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी बावधन पोलीस स्टेशन गु.र.नं. २०६/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ८० (२), १०८, ११५ (२), ३५२, ३५१ (२), ११८ (१), ३ (५), ६१ (२), २४९ (ब), ८५, ४९ जे. जे. ॲक्ट कलम २०१५ कलम ७५, ८७ हुंडा प्रतिबंधक अधिनियम, कलम ४ प्रमाणे दि.१७.०५.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ११ आरोपी असून, गुन्ह्यातील ६ आरोपी न्यायालयीन कोठडीत असून, ५ आरोपींना मा. न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सद्य:स्थितीत गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानवत (जि.परभणी) येथे क्रीडा अधिकारी व अन्य कर्मचारी यांनी लाच घेतल्याबाबत

**(१३)** * **८९१४ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानवत (जि.परभणी) येथे सन २०२४ मध्ये क्रीडा अकादमीच्या जागेवर पूर्ण केलेल्या स्विमिंग पुलाचे ९० लाख रुपयांच्या तसेच ५ लाख रुपयांच्या ६ क्रीडा स्पर्धा देयक थकीत प्रकरणी जिल्हा क्रीडा अधिकारी व कर्मचारी यांनी तक्रारदाराकडे रुपये २ लाख ५० हजार इतक्या रकमेची लाच मागितली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभागाकडे केलेल्या तक्रारीनुसार दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी प्राथमिक चौकशी करुन कर्मचाऱ्याने स्वत:साठी ५० हजार रुपये आणि क्रीडा अधिकारी यांचेसाठी १ लाख रुपये स्वीकारल्याने दोघांनाही तात्काळ अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अधिक चौकशी केली असता क्रीडा अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध यापूर्वी देखील निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्त वेतन मंजुरीच्या प्रकरणांत देखील गैरकारभार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सेवाविषयक आर्थिक लाभ देण्यासाठी पैशाची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदाराने जिल्हा क्रीडा अधिकारी, परभणी व क्रीडा अधिकारी यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे, ही बाब खरी आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारे प्राथमिक चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन नवामोंढा, जि. परभणी, गु. र. क्र. १११/२०२५ कलम ७, ७अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये, दि.२७.०३.२०२५ रोजी गुन्हा नोंद करुन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने अधिकचा तपास करण्यात येत आहे. तसेच शासनाच्या दि.०३.०४.२०२५ च्या आदेशान्वये, संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी व क्रीडा अधिकारी यांना शासन सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बदलापूर (जि.ठाणे) परिसरात नवजात बालकांच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(१४) * ७५६१ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील परिसरात नवजात बालकांच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संशयीत म्हणून बदलापूर पोलिसांनी एका व्यक्तीस अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू व्यक्तीची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधिताविरुद्ध कारवाई करण्यासह अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) आणि (३) होय, हे अंशत: खरे आहे.

बदलापूर (प.), ता. अंबरनाथ, जि.ठाणे येथे एका इसमाने त्याच्या मोबाईलमध्ये इंटरनेटव्दारे व्हॉटसअप या सोशल मिडीयाचा वापर करून काही नवजात बालकांचे फोटो व व्हिडीओ तसेच त्यांच्या किंमतीसंबधी व्यवहार केल्याचा संदेश/चॅट्स दिसुन आले असल्याने बदलापूर (प.) पोलीस ठाणे, ठाणे येथे दि.०४.०४.२०२५ रोजी गु. र. क्र. १३५/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ मध्ये कलम १४३(१), १४३(२), १४३(३), १४३(४), १४३(५), ६२, सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ६६ (ड), ६६ (क), सह अल्पवयीन न्याय मुलांची काळजी व संरक्षण कायदा, २०१५ मधील कलम ८१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीला अटक करुन त्याच्यांविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मांडवे (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथे अनधिकृतरित्या खडी वाहतूक सुरु असल्याबाबत

**(१५)** * **७४५९ श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवे (ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर) येथे ट्रकमधून खडी वाहतूक सुरळीत सुरु ठेवण्यासाठी तसेच कोणतीही कारवाई न करण्यासाठी पन्नास हजार रुपयांची लाच स्वीकारताना यूट्युब पत्रकाराला नाशिक येथील लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने माहे एप्रिल, २०२५ मध्ये रंगेहाथ पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रकाराने तलाठ्याचे नाव सांगून तक्रारदाराकडे दरमहा चाळीस हजार रुपयांची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) I. सदर प्रकरणी खडी वाहतुकीचा ट्रक सुरळीत सुरु ठेवण्यासाठी व त्यावर कुठलीही कारवाई न करण्यासाठी आलोसे क्र.१ तलाठी सजा-मांडवे, ता.संगमनेर, जिल्हा-अहिल्यानगर यांच्या वतीने व त्यांच्या सहमतीने आरोपी क्र.२ खाजगी व्यक्ती व्यवसाय-पत्रकारिता यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे व त्यास आलोसे क्र.१, तलाठी यांनी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

II. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या लाचेच्या सापळा कार्यवाही प्रकरणी उपरोक्त दोन्ही आरोपींविरुद्ध घारगांव पोलीस ठाणे, जि. अहिल्यानगर येथे गु.र.नं. १२४/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (सुधारणा) चे कलम ७, ७(अ) व १२ प्रमाणे दिनांक १७/०४/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांच्यामार्फत सुरु आहे.

III. सदर प्रकरणी आलोसे क्र.२, तलाठी यांचा अटकपुर्व जामीन अर्ज मा. विशेष न्यायालय, संगमनेर यांनी नामंजुर केला असल्याने सदर गुन्ह्यात त्यांना अटक करण्याची तजविज ठेवण्यात आलेली आहे. तसेच आलोसे क्र.२, तलाठी यांना जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांच्या दिनांक १३/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अर्नाळा (जि.पालघर) गावातील स्थानिक मच्छीमार विक्रेत्या महिलांची आर्थिक फसवणूक झाल्याबाबत

**(१६)** * **७१३९ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्नाळा (जि.पालघर) गावातील मासे विक्रेत्या महिलांकडून मासे खरेदीमध्ये आफ्रीदी खान या परप्रांतीय दलालाने अंदाजे १ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक करुन तेथून पलायन केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय यांना दिनांक १७ फेब्रुवारी, २०२५ रोजी लेखी निवेदनान्वये चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार स्मरणपत्रे पाठवूनही कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लोकप्रतिनिधींच्या पत्रांची दखल न घेणाऱ्या संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आणि (२) अंशत: खरे आहे.

परप्रांतीय दलालाने मासे विक्रेत्या महिलांकडून माहे जानेवारी, २०२५ मध्ये ३० ते ४० लाख रुपयांचे मासे खरेदी करुन आर्थिक फसवणूक केली असून याबाबतची तक्रार अर्नाळा पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर, वसई-विरार येथे प्राप्त झाली. त्यानुषंगाने अर्नाळा पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. १०२/२०२५ मध्ये दि. २१.०६.२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) आणि (४) सदर प्रकरणी महिला तक्रारदार व लोकप्रतिनिधींनी अर्नाळा पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज केला होता. त्यानुषंगाने चौकशी सुरु होती तसेच अर्जदार यांच्याकडे उधारीने दिलेल्या सुक्या मच्छीचे कागदपत्र नसल्याने सदर बाब ही दिवाणी किंवा फौजदारी असल्याची पडताळणी करण्याची प्रक्रिया सुरु होती. तसेच आरोपीचा दिलेल्या पत्त्यावर शोध घेतला असता तो मिळून आलेला नाही. त्यामुळे सदर अर्जाच्या अनुषंगाने सरकारी अभियोक्ता यांचा टिपणी अहवाल सादर करुन अर्नाळा पोलीस ठाणे येथे दि.२१.०६.२०२५ रोजी गु.र.क्र.१०२/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परदेशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

**(१७) * ९८११ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातून परदेशी उच्च शिक्षणासाठी गेलेल्या अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग तसेच अल्पसंख्याक प्रवर्गातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना गेल्या दोन-तीन महिन्यांपासून परदेशी शिष्यवृत्तीची रक्कम न मिळाल्याने विद्यार्थी आर्थिक संकटात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परदेशी शिक्षणासाठी पाठविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठा खर्च येत असल्यामुळे त्यांना सदर रक्कम न मिळाल्याने शिष्यवृत्तीधारकांची गैरसोय होत असून त्यांच्या शिक्षणात खंड पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परदेशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम तातडीने अदा करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिका क्षेत्रात सदोष विद्युत मीटरमुळे ग्राहकांना अतिरिक्त रक्कमेची देयके येत असल्याबाबत

**(१८) * ८१५६ श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरण कंपनीने सन २०१७ मध्ये काळया यादीत टाकलेल्या हैद्राबाद येथील रोलेक्स कंपनीला लाखो विद्युत मीटर बसविण्याचे काम दिले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कंपनीमार्फत नाशिक महानगरपालिका क्षेत्रात ६३ हजार ५८५ मीटर बसविण्यात आले असून, या सदोष विद्युत मीटरमुळे ग्राहकांना पाचपट देयके येत असल्याने नाशिक महावितरणकडे नागरिकांनी लेखी तक्रारी माहे एप्रिल, २०२५ मध्ये केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू सदोष मीटरमुळे महावितरण व ग्राहक या दोघांचेही आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने चुकीची देयके अदा करणाऱ्या संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह ग्राहकांना अचुक देयके अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सन २०१४-१५ साली मे. रोलेक्स कंपनीने पुरवठा केलेल्या सदोष मीटरमुळे या कंपनीला सन २०१७ साली काळया यादीत टाकण्यात आले आहे. सदर पुरवठा आदेशानंतर मे. रोलेक्स कंपनीस विद्युत मीटर पुरवठ्याचे किंवा मीटर बसविण्याचे काम आजतागायत देण्यात आलेले नाही.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या दि. १७.०८.२०२१ नुसार सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविणे सुचित करण्यात आले आहे. केंद्रशासनाने निर्गमित केलेल्या प्रमाणित निविदातील (Standard Biding Document) तरतुदीनुसार पारदर्शकरित्या कार्यवाही करून महावितरणमार्फत स्पर्धात्मक पद्धतीने निविदा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

नाशिक मंडळात मीटर बसविण्याचे काम मे. एनसीसी कंपनीस देण्यात आले असून, आजपर्यंत नाशिक मंडळाअतंर्गत १,०४,३६५ इतके स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. सदर मीटर लावल्यामुळे ग्राहकांना अचुक बिल देण्यास मदत होत आहे. सदर मीटर ग्राहकांना मोफत लावण्यात येत असून, स्मार्ट मीटरमुळे ग्राहक व महावितरण हयांचे आर्थिक नुकसान होत नाही. सद्यस्थितीत सदर स्मार्ट मीटर हे पोस्टपेड पध्दतीने बसविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वडपे (ता.भिवंडी, जि.ठाणे) गावात असलेल्या रिचलँड कंपाऊंड मधील गोदामाला आग लागल्याबाबत

**(१९) * १०६०५ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडपे गावात (ता.भिवंडी, जि.ठाणे) असलेल्या रिचलँड कंपाऊंड मधील गोदामाला भीषण आग लागल्याची घटना दिनाक १२ मे, २०२५ रोजी घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीत २२ गोदामे जळून खाक झाली असून त्यात कपडे, बुट, केमिकल तसेच इलेक्ट्रॉनिक उत्पादनांना आग लागून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) मौजे वडपे, ता.भिवंडी, जि. ठाणे येथे दि. १२/०५/२०२५ रोजी रिचलँड कंपाऊंड मधील गोडाऊन क्र. D७ व D८ या गोडाऊनला पहाटे ०३.०९ वा. आग लागून या गोडाऊनमधील वेगवेगळया मालकांचे ८४ युनिट्स होती. त्यामध्ये ६ कंपन्याचा माल होता. सदरचे आग ही सायंकाळ ६.०० वा. सुमारास भिवंडी मनपा व कल्याण डोंबिवली मनपा च्या अग्निशमन दलामार्फत विजविण्यात आली. प्राथामिक अंदाज व कंपनी मालक यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे सदर दोन्ही गोडावूनचे संपूर्ण लोखंडी अँगल व पत्रे तसेच स्ट्रक्चर आगीमुळे व उष्णतेने पडुन नुकसान झालेले आहे. तसेच संपूर्ण गोडाऊनमधील ऑफिस फर्निचर व इलेक्ट्रीक वायरिंग, कॉम्प्युटर व प्रिंटर्स तसेच महत्वाची कागदपत्रे इत्यादीचे जळून नुकसान झाले असल्याचे अनुमान आहे. तथापि, घटनास्थळी कोणीही जखमी अथवा मृत झाले नसल्याचे प्राप्त अहवालामध्ये नमूद केले आहे.

रिचलँड कंपाउंड येथे दिनांक १२/०५/२०२५ रोजी लागलेल्या आगीच्या घटनेच्या अनुषंगाने आकस्मित जळीत प्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६/२०२५ नुसार दिनांक १३.०५.२०२५ रोजी गुन्हा दाखल झाला असून या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

-----------------

## राज्यातील इतर मागासवर्गीयांसाठी मोदी आवास घरकुल योजनेचे अनुदान वेळेत न मिळाल्याबाबत

**(२०) * ७०८० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात इतर मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) मोदी आवास घरकुल योजनेतून ३ लाख घरांना मंजूरी देण्यात आली असून सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील योजनेतंर्गत घरकुलांना निधी न दिल्याने अनेक लाभार्थी अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतील ५० टक्क्यांपेक्षा जास्त लाभार्थी अद्याप अनुदानापासून वंचित असून २५ टक्के घरांची कामे अद्याप अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरीता व अनुदान तात्काळ वितरीत करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

मोदी आवास घरकुल योजनेंतर्गत सन २०२३-२४ करीता ३ लाख घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून त्यांकरीता सन २०२३-२४ मध्ये रु.१२००.०० कोटी आणि सन २०२४-२५ मध्ये रु.२५८८.५९ कोटी असा एकूण रु.३७८८.५९ कोटी इतका निधी राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(२) व (३) सदरहू योजनेंतर्गत मंजूर घरकुलांकरीता आवश्यक असलेला पुर्ण निधी राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण यांच्याकडे उपलब्ध असून बांधकाम पुर्णत्वाच्या टप्प्यानुसार २,९४,७८४ लाभार्थ्यांना पहिला हप्ता, २,३१,७८३ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, १,९९,४९७ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता आणि १,१६,७२४ लाभार्थ्यांना चौथा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. मोदी आवास घरकुल योजनेंतर्गत सद्य:स्थितीत १,६६,३२२ घरकुलांचे बांधकाम पुर्ण झाले असून उर्वरित घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुनी पडोली व मौजा विचोडा बुद्रुक (जि.चंद्रपूर) येथे शेतीच्या जागेवर अनधिकृतपणे उद्योग सुरु केल्याबाबत

**(२१)** * **१०९२८ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथील इरई नदीला लागून जुनी पडोली व मौजा विचोडा बुद्रुक या गावात शेतीच्या जागेवर (कृषक जागेवर) प्रदुषण नियंत्रण मंडळ, जिल्हा प्रशासन व ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी नसतांना अनधिकृतपणे लोह दगडाच्या क्रशरचा उद्योग सुरु केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उद्योगातून निघणाऱ्या धुळीमुळे व प्रदुषणामुळे परिसरातील शेती, आंब्याच्या बागा पूर्णपणे उध्वस्त झाल्या असून इरई नदी, विहिरी व हातपंपाचे पाणी प्रदूषित झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी अवैध उद्योग बंद करण्याकरीता व संबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी, चंद्रपुर, पालकमंत्री व मा.पर्यावरण मंत्री यांचेकडे माहे एप्रिल, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा कृषि अधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधिन परिसरातील उद्योगातून निघणाऱ्या धुळीमुळे व प्रदुषणामुळे शेती, आंब्याच्या बागा पूर्णपणे उध्वस्त झाल्याबाबतची तक्रार स्थानिक शेतकऱ्यांकडून कृषि विभागास प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे आहे.

जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे कार्यालयाकडे दि.२३/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये लेखी निवेदन प्राप्त झाले होते.

(४) मे. डॉस अलॉयज या उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि.१६/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये संमतीपत्र अर्ज नाकारण्याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या परिक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्ती न मिळाल्याबाबत

**(२२) * ७१०३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अराजपत्रित गट-"ब" व गट-"क" लिपिक टंकलेखक भरती प्रक्रियेद्वारे ७००६ पदे भरण्यात येणार होती. मात्र, पात्र उमेदवारांची संख्या भरपूर असूनही दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या अंतिम निवड यादीत फक्त ६६१३ उमेदवारांचीच निवड करण्यात आली असून शासनाच्या विविध विभागांतील ३९३ पदे रिक्त असल्यामुळे लिपिक वर्गाच्या कमतरतेमुळे कामकाजावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवड रद्द केलेल्या उमेदवारांची यादी दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी प्रसिद्ध करूनही, त्यानंतर रिक्त जागांसाठी अद्याप पर्यायी निवड यादी प्रसिद्ध करण्यात आलेली नसल्याने अनेक पात्र उमेदवारांची संधी वाया गेली असून, संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, राज्य लोकसेवा आयोगामार्फत माहे जानेवारी, २०२३ मध्ये कर सहायक या पदावरील ४६८ उमेदवारांना व राज्य उत्पादन शुल्काची ५ पदे असून त्यांनाही अद्याप नियुक्ती मिळाली नसुन तांत्रिक सहाय्यक-१ पद असून याचा निकालच प्रलंबित असल्याने अशा ८,१७० पदांची नियुक्ती प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्य लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा दिनांक १ डिसेंबर, २०२४ रोजी पार पडली असून या परीक्षेचा निकाल दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी जाहीर करण्यात आला असून निकालाच्या गुणवत्ता यादीमध्ये कट ऑफ पेक्षा जास्त गुण असून देखील अनेक विद्यार्थ्यांची नावे या यादीमध्ये नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात विद्यार्थ्यांनी ऑप्टिकल मार्क रिकग्निशन (ओएमआर) शीट तपासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सचिवांशी संपर्क साधला असता त्यांनी विद्यार्थ्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

दि.१६ एप्रिल,२०२५ रोजी आयोगाने लिपिक-टंकलेखक संवर्गाची अंतिम निवड यादी प्रसिध्द केली नसून नियुक्ती प्राधिकारीनिहाय स्वतंत्र तात्पुरती निवड यादी प्रसिध्द केली आहे. त्यानुसार ६६०० उमेदवार शिफारसपात्र ठरले आहेत.

(२) हे खरे नाही.

• आयोगाने लिपिक-टंकलेखक संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी दि.११.०२.२०२५ रोजी प्रसिध्द करुन उमेदवारांकडून नियुक्ती प्राधिकारी निहाय पसंतीक्रम मागविला.

• उमेदवारांच्या पसंतीक्रमानुसार २७८ नियुक्ती प्राधिकारी निहाय स्वतंत्र तात्पुरत्या निवड याद्या दि.१६.०४.२०२५ रोजी प्रसिध्द केल्या.

• त्यानंतर आयोगाने उमेदवारांकडून Opting Out चा विकल्प मागविण्यात आला असता ६७१ उमेदवारांनी Opting Out चा विकल्प निवडला. त्यानुसार अंतिम निकाल जाहिर करण्याची कार्यवाही आयोगाच्या स्तरावर सुरु आहे.

(३) अंशत: खरे आहे.

कर सहायक या संवर्गासाठी विज्ञापित केलेल्या ४६८ पदांपैकी आयोगाने शिफारसपात्र ठरलेल्या ४६५ उमेदवारांची मार्च, २०२५ मध्ये वित्त विभागास शिफारस केली. त्यापैकी १८५ उमेदवारांना मे, २०२५ मध्ये नियुक्ती आदेश देण्यात आले असून उर्वरित उमेदवारांचा प्रमाणपत्र पडताळणीचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरित नियुक्ती आदेश देण्यात येतील.

दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क या संवर्गासाठी विज्ञापित केलेल्या ६ पदांसाठी आयोगाने ६ उमेदवारांची एप्रिल, २०२४ मध्ये गृह विभागास शिफारस केली. त्यापैकी १ उमेदवार कागदपत्र पडताळणीस गैरहजर होता व २ उमेदवार पडताळणीअंती अपात्र ठरले. उर्वरित ३ उमेदवार पात्र ठरल्याने त्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले. त्यानंतर गृह विभागाने मागणी केल्यानुसार आयोगाने प्रतिक्षायादीतून ३ उमेदवारांची शिफारस मे, २०२५ मध्ये केली. सदर ३ उमेदवारांची कागदपत्र/प्रमाणपत्र व शारिरीक पडताळणी करण्याची कार्यवाही सुरु असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरित नियुक्ती आदेश देण्यात येतील

तांत्रिक सहाय्यक या संवर्गासाठी शिफारस केलेल्या एका पदावर दि.११.०९.२०२४ च्या आदेशान्वये नियुक्ती देण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात पशुधन विकास मंडळात साहित्य खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२३) * ७११५ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पशुधन विकास मंडळातील मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ.सतीश राजू यांनी जनावर साहित्य खरेदीमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खरेदी धोरण नियमांचे उल्लंघन करून जनावरांचे कृत्रिम रेतन, गर्भधारणा तपासणी, वंधत्व तपासणीसाठी २ कोटी ४९ लाख रुपयांचे, ४८ लाख ९९ हजार नग प्लास्टिक हातमोजे खरेदी केले असून 'स्टील युनिव्हर्सल आर्टीफिशीयल इन्सेमिनेशन गन', थाऊ मॉनिटर, थर्मास फ्लास्क, डिप स्टीक इत्यादी साहित्य बाजारभावापेक्षा जास्त दराने खरेदी करण्यात आल्याचे पुरावे मा.मुख्यमंत्र्यासह पशुसंवर्धन मंत्री आणि विभागाच्या सचिवांकडे देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुधन विकास मंडळाच्या अधिकाऱ्यांनी खरेदी करताना योग्य निविदा प्रक्रिया न राबविता बाजारभावापेक्षा अधिक दराने साहित्य खरेदी केल्यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशीअंती संबंधितांविरुध्द कारवाई करून मंडळात अशा प्रकारचे गैरव्यवहार होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) सदर आशयाची तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) व (४) पशुधन विकास मंडळ, नागपूर या संस्थेचे सन २०२१-२२ ते सन २०२३-२४ या कालावधीचे विशेष लेखा परिक्षण करण्यात येत असून सदर लेखा परिक्षणाबाबत दिनांक २८.०३.२०२५ रोजी आढावा घेण्यात आला. आढाव्यादरम्यान प्राप्त झालेल्या प्राथमिक अहवालातील निष्कर्ष विचारात घेऊन डॉ. सतीश राजू यांच्याकडील मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाचा कार्यभार काढून घेण्यात आला आहे.

लेखा परिक्षणाच्या अंतरीम अहवालानुसार वित्तीय अनियमितता झाली असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत असल्याने डॉ. सतीश राजू यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळामार्फत भाडेतत्वावर बस गाडया खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(२४) * ७४२८ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) १३१० बस गाडया भाडेतत्वावर खरेदी करण्याच्या प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याने चौकशी करून सदरची प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबतची तक्रार कोणी केली होती व सदर प्रकरणी कोणामार्फत चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सदर निर्णयास मा. मुख्यमंत्री महोदयांनी स्थगिती दिलेली असून गैरव्यवहाराच्या चौकशीचे आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशीअंती गाड्या खरेदी करण्याची प्रक्रिया रद्द करण्यात आली असली तरी यामध्ये २ हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२) सदर तक्रार डॉ. किरीट सोमय्या यांनी केली होती. शासनाने त्याबाबत चौकशी केली आहे.
(३) होय.
(४) व (५) चौकशी सुरू आहे.

-----------------

## मौजे धसई व मौजे शहापुर (ता.शहापुर, जि.ठाणे) येथील कर्म रेसिडेन्सी या गृहप्रकल्पाच्या नावाने गृहखरेदीदारांची केलेली फसवणूक

**(२५)** * **८१४१ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धसई व मौजे शहापुर (ता.शहापुर, जि.ठाणे) येथील कर्म रेसिडेन्सी या गृहप्रकल्पाच्या नावाने ११ हजारांहून अधिक खरेदीदारांची १ हजार कोटीहून अधिक रकमेची फसवणूक करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त फसवणूक करणाऱ्या कर्म रिअल इस्टेट कंपनीची सुमारे १९ कोटी रुपयांची संपत्ती अंमलबजावणी संचालनालयाने (E.D.) जप्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित कंपनीविरुद्ध कारवाई करण्यासह फसवणूक झालेल्या गृहखरेदीदारांची रक्कम त्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

मौजे धसई व मौजे शहापुर, तालुका शहापुर, जिल्हा ठाणे येथे कर्म इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या बांधकाम व्यावसायीक कंपनीच्या संचालकांकडून गृहप्रकल्प उभारण्यात आला. सदर गृहप्रकल्पातील फ्लॅट खरेदीकरीता अनेक जाहिराती प्रसिध्द करून गुंतवणुकदारांना विविध प्रलोभने दाखवुन फिर्यादी व साक्षीदार यांचेशी फ्लॅट विक्रीचे करार नोंदणीकृत केले. तसेच सदर फ्लॅटवर वेगवेगळया बँका, फायनान्स कंपनीकडून कर्ज मंजुर करुन घेवून कर्जाची रक्कम परस्पर कर्म पंचतत्वचे नावे वर्ग केली. फिर्यादी व साक्षीदार यांना त्यांनी विकत घेतलेले फ्लॅट अगर त्यांनी दिलेली रक्कम परत न करता फसवणुक केलेली आहे. सदर कंपनीविरुद्ध तीन ठिकाणी गुन्हे दाखल असून तीन गुन्ह्यांमध्ये आत्तापर्यंत १३६४ गुंतवणूकदारांची रु.१०२,७०,२५,००४/- इतक्या रकमेची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.

कर्म इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीचे संचालक आणि इतर संबंधितांची रु.१९.६१ कोटी इतक्या रकमेच्या मालमत्ता जप्तीचे आदेश अंमलबजावणी संचालनालयाने दिलेले आहेत.
(३) कर्म इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीच्या संचालकांविरुद्ध शहापूर पोलीस ठाणे, जिल्हा ठाणे येथे गु.र.क्र.३८३/२०२१, सफाळा पोलीस ठाणे, जिल्हा पालघर येथे गु.र.क्र.११६/२०२२ आणि नौपाडा पोलीस

ठाणे, जिल्हा ठाणे येथे  गु.र.क्र.४८/२०२२ हे तीन गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्हे भा.द.वि.सं. चे कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ सह महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिका अधिनियम, १९६३ चे कलम ३, १३(१) सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ (एमपीआयडी ॲक्ट) चे कलम ३ व ४ अन्वये दाखल आहेत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.०८.१२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये सदर तीनही गुन्ह्यांचा तपास पोलीस अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे हे करत आहेत. सदर तीनही गुन्ह्यांच्या अनुषंगाने आरोपी कंपनी, कंपनीचे संचालक व इतर संबंधित यांच्या मालमत्ता एमपीआयडी कायद्यान्वये जप्त करुन सदर जप्त मालमत्तांवर सक्षम प्राधिकारी म्हणून उपविभागीय दंडाधिकारी, भिवंडी यांची नेमणूक करण्याबाबतचे शासन आदेश दि.१०.१०.२०२४ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले आहेत. सदर शासन आदेशान्वये आरोपी कंपनी व संचालकांच्या एकूण रु.११३,९०,१६,७९७.९८/- इतक्या रकमेची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार एमपीआयडी कायद्यान्वये पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दहिगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या पाड्यांमध्ये वीज पुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(२६) * ८८८६  श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :**  सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या तळवडा या आदिवासी पाडयांसह मनाचा आंबा, तुंबडेपाडा, कंडोलपाडा, पोई व शिसवली अशा १४०० च्या आसपास लोकसंख्या असलेल्या ५ पाड्यांमध्ये वीज पुरवठा केला नसल्याचे दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी सन २०१६ मध्ये ३८ लाख रुपयांची वीजपुरवठा योजना मंजूर केली असून या योजनेंतर्गत १९ किलोमिटर पर्यंतच्या अंतरावर २४ वीजेचे खांबे उभारुन घरोघरी वीजपुरवठा करण्यात येणार होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजना कार्यान्वित होत असतांना वन विभागाने आडकाठी आणल्यामुळे गत नऊ वर्षापासून येथील ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत असल्याने उक्त प्रकरणी वन विभागाच्या कार्यालयावर तेथील ग्रामस्थांनी मोर्चा काढल्यानंतर वनविभागाने सर्व अटी मान्य केल्यानंतरही आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त तालुक्यातील ५ पाड्यांत वीजपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची बातमी दि.२७.०३.२०२५ रोजी दैनिक वृत्तपत्रात छापून आली होती.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील दहिगांव ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या तळवडा या आदिवासी पाड्यासह मनाचा आंबा, तुंबडेपाडा, कंडोलपाडा, पोई व शिसवली अशा १४०० च्या आसपास लोकसंख्या असलेल्या ५ पाडयांना  वनविभागाची परवानगी नसल्याने पारंपारिक पध्दतीने वीजपुरवठा करण्यात आलेला नाही.

तथापि, काही ठिकाणी वाडी-पाडयांना पारेषण विरहीत सौर ऊर्जेद्वारे (off-grid Solar) विद्युत पुरवठा केला जात आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर ठिकाणी सन २०१६ मध्ये फक्त तळवाडा व शिसवली या पाडयांकरीता जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले होते. सदर कामास सुरुवात केली असता, वनविभागाकडून सदर कामास विरोध दर्शविल्यामुळे काम थांबविण्यात आले होते.

(३) हे खरे नाही,

ग्रामस्थांनी मोर्चा काढल्यानंतर वनविभागाने सदर कामासाठी मान्यता दिली. त्यानंतर महावितरणमार्फत नव्याने सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक मंजूर केले आहे. सदर अंदाजपत्रकास दि. २९.०५.२०२५ अन्वये प्रकल्प अधिकारी, एकात्मक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांचेकडून रु.२,९१,९२,०५१/- इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

(४) प्रशासकीय मान्यतेनुसार निधी प्राप्त झाल्यानंतर सदर सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण करुन उपरोक्त गावांचा विद्युत पुरवठा चालू करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने इडब्ल्यूएस आणि एसईबीसी आरक्षणाचा संभ्रम दूर करण्याबाबत**

**(२७) * ७५६२ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अभिमन्यु पवार (औसा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने इडब्ल्यूएस आणि एसईबीसी आरक्षणाचा संभ्रम दूर करून मुख्य परीक्षेला पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी पुरेसा वेळ देवून परीक्षा १५ दिवस पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी स्पर्धा परीक्षाधारक विद्यार्थ्यांनी पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य परीक्षेला राज्यभरातून ७ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी पात्र ठरले असताना मात्र २ हजार विद्यार्थ्यांनीच अर्ज केले असून आरक्षणातील त्रुटींमुळे उर्वरित विद्यार्थ्यांचे अर्जच भरले जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना प्रवर्ग बदलण्यासाठी लिंक उपलब्ध करून द्यावी अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरक्षणाच्या संभ्रमामुळे एमपीएससी विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नयेत याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) काही उमेदवारांनी अर्ज सादर करण्यास पुरेसा वेळ द्यावा तसेच परीक्षा पुढे ढकलण्याची आयोगास मागणी केली होती. त्यानुसार आयोगाने राज्य सेवा (पूर्व), परीक्षा-२०२४ च्या सुधारित निकालानुसार नव्याने मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ दिली.
(२) व (३) राज्य सेवा मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या ७९७० उमेदवारांपैकी ७८२३ उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केले आहेत. सबब, उमेदवार मुख्य परीक्षेसाठी अर्ज भरु शकले नाहीत अशी वस्तुस्थिती नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संगमनेर (जि.अहिल्यानगर) शहरात गोमांस विक्री होत असल्याबाबत

**(२८) * ७४६१ श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.अमोल जावळे (रावेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर (जि.अहिल्यानगर) शहरातील भारतनगर, गल्ली नं १ येथील वाड्यात १२०० किलो गोमांस तसेच ३ लाख ६० हजार रुपये किंमतीची कत्तल करण्यासाठी आणलेली पशुधन, कत्तलीसाठी वापरला जाणारा सुरा इत्यादी मुद्देमाल घटनास्थळी आरोपीकडून माहे एप्रिल, २०२५ मध्ये जप्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात गोवंश हत्येवर बंदी लागू असतानाही संगमनेर व आजुबाजूच्या परिसरात काही समाजकंटक अद्यापही चोरट्या मार्गाने गांईच्या कत्तली करून गोमांसाची विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच वकडी (जि.यवतमाळ) येथे गोवशांची कत्तलीसाठी तस्करी करणारे वाहन पकडून त्यातून १२ जनावरांसह २२ लाख ४० हजारांचा तसेच साखरा येथील धाब्याजवळ दोन ट्रकमधून ४२ जनावरांची सुटका करुन ८० लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त करुन स्थानिक पोलीसांनी कारवाई केली असून रावेर (जि.जळगांव) येथे ५ वर्षात गोहत्या व तस्करीच्या मोठ्या प्रमाणात घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध गोहत्या प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई करण्यासह प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

यवतमाळ घटकातील वडकी येथे गोवंश कत्तलीसाठी तस्करी प्रकरणी पो.स्टे वडकी येथे अप.क्र २२४/२०५५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तसेच पो. स्टे पांढरकवडा हद्दीतील ग्राम साखरा जवळ अवैध गोवंश तस्करी संबंधाने स्थानिक पोलीसांव्दारे ३ कारवाई करण्यात आली असुन सदर प्रकरणी पो.स्टे पांढरकवडा येथे अप.क्र १) ३००/२०२५ २) ३०१/२०२५ ३) ३७१/२०२५ अन्वये गुन्हे नोंद आहेत.

(४) व (५) १) संगमनेर शहर पोलीस स्टेशन हद्दीत चोरट्या मार्गाने गाईच्या कत्तली व गोमांसची विक्री होत असुन त्यावर प्रतिबंध होण्याकरीता १ जानेवारी २०२५ ते १२ जुन २०२५ रोजी दरम्यान एकुण ४४ गुन्हे दाखल करण्यात आले असुन चोरट्या मार्गाने गाईच्या कत्तली व गोमांस विक्री करणारे आरोपींवर खालील प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

- MPDA-०१
- म.पो. अधि. कलम ५५ प्रमाणे - ०३
- म.पो.अधि. कलम ५६ प्रमाणे- ०२
- प्रस्तावित म.पो.अधि. कलम ५६ प्रमाणे- २०

२) जळगांव जिल्हा घटकातील रावेर तालुक्यात ५ वर्षात गोहत्या व तस्कारीच्या घटनांच्या संदर्भात ३२ प्राणी वाहतुक गुन्हे व ५ मांस विक्री गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

३) यवतमाळ घटकात अवैध जनावर वाहतुक संबंधाने जानेवार ते मे २०२५ अखेर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

- दाखल गुन्हे- ७६
- गोवंश जप्त - ६५४ गोवंश जनावर व ७५१ कि.ग्रॅ मांस
- वाहने जप्त-७२

सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन त्या अनुषंगाने संबंधीतांविरुद्ध वरप्रमाणे गुन्हे दाखल करुन त्यांचेवर योग्य ती प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच गोहत्या व तस्करीच्या घटना घडु नये याकरिता वेळोवेळी नाकाबंदी लावुन संशयीत वाहने चेक करणे, गावोगावी बातमीदार यांचे मार्फत माहिती हस्तगत करणे, पो.स्टे स्तरावर गोवंश तस्करी संबंधाने बैठकीचे आयोजन करुन अवैध गोवंश तस्करी, गोहत्या व गोमांस विक्री होणार नाही यासंदर्भात कायदयातील तरतुदी बद्दल जनजागृती करण्यात येते.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांनी बनावट कागदपत्रे तयार करुन मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून निधी घेतल्याबाबत

**(२९) * ९८१४ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांनी बनावट कागदपत्रे आणि रुग्णनोंदी तयार करुन मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून ४ लाख ७५ हजार रुपयांचा निधी घेतल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कल्याण येथील खडकपाडा पोलीस ठाण्यात दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दाखल केलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषीविरुद्ध कारवाई करण्यासह अशा प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आणि (२) होय, हे अंशत: खरे आहे.

गणपती मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल, आंबिवली (पूर्व), जि. ठाणे येथील एक डॉक्टर व इतर दोन डॉक्टर नसलेल्या व्यक्तींनी संगनमत करून प्रत्यक्षात १३ रुग्ण शस्त्रक्रिया व औषधोपचारासाठी सदर हॉस्पिटलमध्ये दाखल नसताना, बनावट कागदपत्रांआधारे शस्त्रक्रिया झाल्याचे व औषधोपचार घेतल्याचे दाखवून मुख्यमंत्री सहायता निधी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून बनावट कागदपत्रांच्या आधारे रु.४ लाख ७५ हजार इतकी रक्कम सदर हॉस्पिटलच्या बँक खात्यात प्राप्त करून घेऊन शासनाची फसवणूक केली आहे. याबाबत प्रभारी सहायक संचालक, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन खडकपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दि.१७.०४.२०२५ रोजी गुन्हा रजि. नंबर ३२४/२०२५ मध्ये भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) गु, र. क्र. ३२४/२०२५ अन्वये सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे. तसेच गणपती मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल, आंबिवली (पूर्व), जि. ठाणे या रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या नामिकासूचीवरुन कमी करण्यात आली आहे. तसेच अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्राप्त अर्जांची विहित नियमावलीनुसार छाननी व तपासणी करुन सबंधित अर्जदार रुग्ण व रुग्णालय यांच्याकडे संपर्क करुन खात्री केल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारापूर (जि.पालघर) औद्योगिक विकास महामंडळातील रासायनिक कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(३०) * ८१६८ श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक विकास महामंडळातील रासायनिक कारखान्यांतून प्रक्रियेविनाच अनधिकृतपणे नाल्यात सोडण्यात येणाऱ्या रासायनिक प्रदूषित सांडपाण्यामुळे १३ ग्रामपंचायती अंतर्गत १६ गावांमधील ८६ सार्वजनिक व ५३६ खासगी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत प्रदूषित झाल्याचे दिनांक ८ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्त्रोतामधील रसायनमिश्रित पाणी पिण्यास अयोग्य असल्याने या स्त्रोतांवर जिल्हा परिषद, पालघरने बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, बोईसर व कोलवडे गावांमध्ये मोठ्या प्रमाणात बॉयलरची कोल्ड डस्ट हवेत पसरली असल्याने परिसरात हवा, पाणी, जमीन व ध्वनी प्रदूषणात वाढ झाली असून, कोल्ड डस्टमुळे झाडांच्या पानांवरही काजळीचा थर साचल्याने पर्यावरणावर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कारखान्यातून होणाऱ्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असून प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार तक्रार करुनही याकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामपंचायतीने त्यांच्याविरुध्द आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन होणारे प्रदुषण रोखण्याबाबत तसेच दोषी कंपन्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून कोणत्याही उद्योगास विनाप्रक्रिया सांडपाणी सोडण्यास परवानगी देण्यात येत नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार तारापूर औद्योगिक विकास परिसरातील १३ ग्रामपंचायती अंर्तगत असणाऱ्या स्त्रोतामधील पाणी पिण्यास अयोग्य असल्याबाबत फ़लक संबंधित ग्रामपंचायतीमार्फ़त लावण्यात आले आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र तारापूर, दांडी व मुंरबे अंर्तगत तपासणी करण्यात आलेल्या ३७८ पाणी नमुन्यांपैकी ६ पाणी नमुने दुषित असल्याचे आढळून आले आहे.

(३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून तारापूर औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील गावांमधील हवेची गुणवत्ता राष्ट्रीय हवा गुणवत्ता निरीक्षण कार्यक्रम (NAMP) अंतर्गत तपासण्यात येते. त्यानुसार प्रश्नाधीन गावांमधील एप्रिल २०२४ ते एप्रिल २०२५ या कालावधीमधील हवा गुणवत्ता निर्देशकांचे प्रमाण बहुतांशी वेळा उत्तम व सौम्य पातळीत असल्याचे आढळून आले आहे.

(४), (५) व (६) तारापूर औद्योगिक परिसरातील प्रदुषणाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या व संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन करत असल्यास सदर उद्योगांवर नियमांनुसार वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करण्यात येते.

-----------------

## पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात एका गर्भवती महिलेचा झालेला मृत्यू

**(३१) * ७०८५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अनंत**

**(बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब व निर्धन रुग्णांसाठी धर्मादाय रुग्णालयांमध्ये काही टक्के खाटा ठेवणे बंधनकारक असतानाही काही रुग्णालये गरीब रुग्णांवर उपचार करण्यास नकार देत असल्याच्या तक्रारी शासनाकडे करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथील दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयात प्रसुतीकरीता आलेल्या श्रीमती ईश्वरी (तनिषा) भिसे या महिलेस १० लक्ष रुपये अनामत रक्कम भरणे शक्य झाले नाही. त्यामुळे सदर महिलेवर वेळेत उपचार झाले नाहीत व प्रसुतीनंतर तिचा अतिरक्तस्त्रावामुळे दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयातील डॉक्टर, प्रशासक यांनी ग्रीव्हन्स रिड्रेसल सिस्टम, धर्मादाय कक्ष व जनसंपर्क अधिकारी यांनी धर्मादाय योजनेची माहिती, खर्चाचे विवरण व सल्ला न देता समुपदेशनाच्या कर्तव्यात दुर्लक्ष करून सदर गर्भवती महिलेला धर्मादाय योजने अंतर्गत पात्र असतानाही दाखल करून घेतले नसल्याचे उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या पाच सदस्य समितीने प्राथमिक चौकशीच्या अहवालात दोषी ठरवले असून सदरहू रुग्णालयाने IPF योजनेचे ३६ कोटी ४८ लक्ष रुपये रुग्णांवर खर्च केल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धर्मादाय रुग्णालयाच्या मनमानी कारभारावर आळा घालण्यासाठी आरोग्य विभागाकडून खाटांची उपलब्धता ऑनलाईनरित्या समजावी व रुग्णालयांवर नियंत्रण ठेवण्याकरीता विशेष पथकामार्फत वेळोवेळी तपासणी करण्याच्या सूचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील धर्मादाय रुग्णालयातील गैरकारभारा संबंधी राज्यस्तरीय तथ्य शोधन समितीने विधी व न्याय विभागाकडे पाठविलेला अहवाल ४ महिन्यांपासून प्रलंबित असल्याने याप्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या रुग्णालय, प्रशासन व संबंधितांवर कारवाई करण्यासह राज्यातील धर्मादाय रुग्णालयांत गरीब व निर्धन लोकांना उपचार मिळणेकरीता व सदर रुग्णालयांवर योग्य ते नियंत्रण ठेवण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयात प्रसुतीकरीता आलेल्या श्रीमती ईश्वरी (तनिषा) भिसे या महिलेस १० लक्ष रुपये अनामत रक्कम भरणे शक्य न झाल्याने सदर महिलेवर वेळेत उपचार न केल्यामुळे प्रसुतीनंतर मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली होती. सदर प्रकरणी रुग्णाच्या नातेवाईकांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मधील तरतूदीनुसार तसेच मा. उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या धर्मादाय योजनेंतर्गत निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठीच्या उपचारासाठी कोणतेही कागदपत्र दाखल केल्याचे दिसून आले नाही. याव्यतिरिक्त इतर तक्रारी माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आल्या नाहीत.

(२) दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयात प्रसुतीकरीता आलेल्या श्रीमती ईश्वरी (तनिषा) भिसे या महिलेस १० लक्ष रुपये अनामत रक्कम भरणे शक्य न झाल्याने सदर महिलेवर वेळेत उपचार न केल्यामुळे प्रसुतीनंतर मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाने दि.४/०४/२०२५ रोजी नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार डॉ. घैसास यांच्याकडून Indian Medical Council (Professional Conduct, Etiquette and Ethics) Regulations, २०२२ मधील १.८ चे पालन झाले नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे डॉ. घैसास यांच्या विरुध्द महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांचेमार्फत कारवाई करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागास सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयाकडे निर्धन रुग्ण निधी (IPF) खात्यामध्ये मार्च २०२५ अखेर रु.३४ कोटीपेक्षा आधिकचा आय. पी. एफ. निधी शिल्लक होता असे धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

(४) कोविड १९ साथीच्या दरम्यान ऑनलाईन खाटांची उपलब्धता समजावी म्हणून विभागीय आयुक्त, पुणे यांचे स्तरावरून ऑनलाईन सेवा उपलब्ध झालेली होती.

तसेच धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष स्थापन करण्यात आला असून धर्मादाय रुग्णालयातील खाटांची उपलब्धता समजणे सोयीचे होणेकरिता एक ऑनलाईन प्रणाली / डॅशबोर्ड विधि व न्याय विभागामार्फत विकसित केला आहे. धर्मादाय रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी तपासणी समिती गठीत करण्यात यावी, असे निर्देश शासन परिपत्रक दिनांक १०/०६/२०२५ अन्वये देण्यात आले आहेत.

(५) धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांच्या चौकशी समितीने अहवाल सादर केला असून त्यावर कार्यवाही करण्यात आली आहे.

(६) सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी विधि व न्याय विभाग, शासन निर्णय ०४/०४/२०२५ अन्वये धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली गठीत चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१) नवजात बालिकांच्या नावे प्रत्येकी रुपये पाच लाख मुदत ठेव बँक ऑफ महाराष्ट्र, संगमवाडी शाखा, पुणे येथे करण्यात आली आहे.

तसेच सौ. ईश्वरी (तनिष्का) भिसे या महिलेच्या मृत्यूच्या चौकशी संदर्भातील अहवालानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम ४१ अअ मधील तरतुदीचे उल्लंघन केल्यामुळे कलम ६६ख प्रमाणे कार्यवाही का करण्यात येवू नये याबाबतची नोटीस संबंधीत न्यासाच्या विश्वस्तांना धर्मादाय आयुक्त यांनी दिलेली आहे.

तसेच, धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने दिनांक २१/०४/२०२५ रोजीच्या निर्णयानुसार आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. डॉ. घैसास यांच्या विरुध्द महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांचेमार्फत कारवाई करण्याबाबत

वैद्यकीय शिक्षण विभागास सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच धर्मादाय रुग्णालयामध्ये १८६ धर्मादाय आरोग्य सेवकांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्याबाबत GEM Portal वर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना लोकांना धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा उपलब्ध करून देणे व त्यावर देखरेख ठेवणे यासाठी मा. मुख्यमंत्री तथा मंत्री(विधि व न्याय) महोदयांच्या कार्यालयाच्या अधिनस्त धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मीरा-भाईंदर (जि.पालघर) येथे कार्यरत असलेल्या पोलीस हवालदाराने त्यांच्या मुळ गावातील शेतात एम.डी.ड्रग्जचा कारखाना सुरु केल्याबाबत

**(३२) * ७२४७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर (जि.पालघर) पोलीस आयुक्तालयातील नयानगर पोलिस ठाणे येथे कार्यरत असलेल्या पोलीस हवालदारास रोहिणा (ता.चाकूर, जि.लातूर) या त्याच्या गावातील शेतात एम.डी.ड्रग्जचा कारखाना सुरु केल्याप्रकरणी तसेच वैद्यकीय रजेचा गैरवापर करून बेकायदेशीर कारवायांमध्ये सहभाग घेतल्याप्रकरणी अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी महसूल गुप्तचर संचालनालय, पुणे विभागाच्या पथकाने व पोलिसांनी तेथे धाड टाकली असता कारखान्यात सुमारे १६ कोटी रुपयांचे एम.डी.ड्रग्ज, मेफेड्रोन व इतर उपकरणे जप्त केल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कारखान्यात तयार हाणाऱ्या ड्रग्जची विक्री मुंबई आणि आसपासच्या परिसरात होत असल्याचे तपासात उघड झाल्याने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था तसेच युवा पिढीच्या भविष्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई आणि इतर मोठ्या शहरांमध्ये ड्रग्सच्या विक्रीला आळा घालण्याबाबत कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३), (४) व (५) सदर प्रकरणातील आरोपी मिरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयात कार्यरत पोलीस हवालदार यास डायरेक्टोरेट ऑफ रेव्हेन्यु इंन्टीलीजन्स, पुणे यांनी दि.०८.०४.२०२५ रोजी अटक केली आहे. तसेच अपर

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांच्या दि.२४.०४.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर गुन्ह्यातील आरोपी पोलीस हवालदारास सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द / जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द / सेवनार्थी विरुध्द एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. राज्यात सन २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुद्ध १९२०६ गुन्हे दाखल असून १६९०५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण ३५२१ गुन्हे दाखल झालेले असून ४७६५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू.४३३८.९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपययोजना करते.

राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.

केंद्र शासनाच्या दि.२५.०३.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे. शासन निर्णय दि.०६.०८.२०२४ अन्वये अंमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्यासाठी NCORD (Narco-Coordination centre) सचिवालय म्हणून व विशेष पोलीस महानिरिक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता दि.१९.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णय क्र. एपीओ-३१२३/प्र.क्र.८२/पोल-३ अन्वये एकूण ३४६ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

दरवर्षी २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा केला जातो. या वर्षी दि. १२ जून, २०२५ ते २६ जून, २०२५ या कालावधी दरम्यान राज्यात अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविण्यात येत आहे. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** | **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** | **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.